# जपानी पुष्परचना - भाग ८

मुक्तरचना करताना अनेक नवीन गोष्टी उलगडत जातात. दरवेळी सुचलेली कल्पना वेगळी असते. कधी कधी जवळ साहित्य असते ते पाहून कल्पना सुचते तर कधी कधी कल्पना आधी सुचते आणि त्याप्रमाणे साहित्याची म्हणजेच पानाफुलांची जमवाजमव केली जाते.

यावेळी पुष्परचना तीच पण त्याच्या मागची बॅकग्राऊंड बदलली की कसे त्याच रचनेचे वेगळेपण जाणवते ते आपण बघणार आहोत.

कोणत्या पानाफुलांच्या रंगसंगतीला कोणती बॅकग्राऊंड योग्य याचा अभ्यास यात करता येईल. एकूण तीन रचना आपण बघणार आहोत.

***रचना १*** मध्ये निळ्या रंगाच्या उभ्या पुष्पपात्रामध्ये शतावरी, सदाफुली, ऑर्किड, आणि बेबीज् ब्रेथ वापरले आहे. पांढऱ्या व काळ्या दोन्ही बॅकग्राऊंडवर फोटो घेतले आहेत.






***रचना २*** मध्ये पांढऱ्या गोल पुष्पपात्रामध्ये सदाफुली, फर्न, शतावरी, ग्लॅडीओलाची पाने, बेबीज् ब्रेथ वापरून रचना दोन्ही बॅकग्राऊंडवर केली आहे.







***रचना ३*** मध्ये इकेनोबो स्कूलचा खास असा मून वाज वापरला आहे. जरबेरा, क्रोटन, पिवळ्या रंगाची पाने वापरली आहेत व परत दोन्ही बॅकग्राऊंडवर फोटो काढले आहेत.






तुम्ही पण विचार करून बघा कोणत्या बॅकग्राऊंडवर कोणती रचना जास्त चांगली दिसते आहे. एका वेगळ्या दृष्टिकोनातून यावेळी आपण रचना पाहिल्या.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो इकेबाना, पुणे शाखा
ई मेल asdssd@gmail.com